# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4
Dated 27th Sept. 2011 State University Governed by Maharashtra University Act, 1994 )

## Office of the Director Students' Welfare

**Dr.I.S. Mohurley**
**Director**
Mobile: 7774027661, 9422893555

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: unigug.org/ gondwana.digitaluniversity.ac
**Email :** director.studentwelfaregug@ gmail.com

No.GU/SW/74/2015 Date:04/07/2015

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय:— गणित व भौतिकशास्त्र या विषयामध्ये विशेष प्रज्ञावान विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना नविन मंजूरी सन २०१५—२०१६.**

संदर्भ:— १) शासन निर्णय शिक्षण, क्रिडा व समाजकल्याण विभाग क्र. एससीएच—१४७०/१०७५२/एस. दि. १४/०५/१९७१.
२) पत्र क्र.उशिसं/शिसष्य/परिपत्रक/नमं/गभौशा/२०१५—१६/७६५० दि. २९ जूलै २०१५.

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येत आहे की, सन २०१५—१६ या शैक्षणिक वर्षाकरिता गणित व भौतिकशास्त्र या विषयांमध्ये विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांकडून शिष्यवृत्ती अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्जाचा नमूना संलग्न केला आहे.

आपल्या महाविद्यालयात गणित/भौतिकशास्त्र हा विषय घेवून प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या प्रज्ञावान विद्यार्थ्यांची माहिती सोबतच्या प्रपत्रात अचूक व परिपूर्ण भरुन संचालक विद्यार्थी कल्याण, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचे कार्यालयात पाठविण्यात यावे. गणित/भौतिकशास्त्र शिष्यवृत्तीसाठी संबंधित विद्यार्थ्यांना उच्च माध्यमिक परिक्षेतील एकुण गुणांची सरासरी (टक्केवारी) ६० पेक्षा कमी असता कामा नये. प्रथम वर्ष पदविसाठी गणित व भौतिकशास्त्र विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांची माहिती विषयनिहाय (गणित/भौतिकशास्त्र) स्वतंत्र देण्यात यावी.

सदर शिष्यवृत्तीचा लाभ विद्यार्थ्यांना लवकरात लवकर देता यावा यास्तव सर्व अर्जाचे त्वरीत संकलन करुन प्रस्ताव दि. १०/०९/२०१५ पर्यंत संचालक विद्यार्थी कल्याण, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचे कार्यालयात पाठविण्यात यावे. विहित कालमर्यादेत प्राप्त झालेलेच प्रस्ताव स्विकारण्यात येतील. त्यानंतर आलेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाही.

सदर शिष्यवृत्ती प्रस्ताव महाविद्यालयांनी परस्पर संचालनालयास पाठवू नये. महाविद्यालयाकडून संचालनालयास परस्पर प्राप्त झालेले प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत.

धन्यवाद!

डॉ. ईश्वर श्रा. मोहुर्ले
संचालक
विद्यार्थी कल्याण विभाग

संचालक
विद्यार्थी कल्याण विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११००१.

Web : www.dhepune.gov.in E-mail : scholarshiphd@gmail.com

फोन नं. ०२०/२६१२६९३९ फॅक्स नं. ०२०/२६१११११५३


क्र.उशिसं/शिष्य/परिपत्रक/नमं/गभौशा/२०१५-१६/ 7650 दि.१५/०७/२०१५

29 JUL 2015

**परिपत्रक :-**

**विषय : गणित व भौतिकशास्त्र या विषयामध्ये विशेष प्रज्ञावान विद्यार्थ्यासाठी शिष्यवृत्ती योजना नविन मंजूरी सन २०१५-२०१६**


...विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 4943 दि. 4/8/15


संदर्भ : शासन निर्णय शिक्षण, क्रिडा व समाजकल्याण विभाग क्र. एससीएच-१४७०/१०७५२/एस. दिनांक : १४.५.१९७१.

DSW
आवक.13/2015
04/08/15

१) संदर्भिय शासन निणर्यान्वये सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाकरिता गणित व भौतिकशास्त्र विषयामध्ये विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांकडून अर्ज मार्गविण्यात येत आहे. सोबत अर्जाचा नमुना जोडलेला आहे.

२) आपल्या विद्यापीठातील व विद्यापीठाचे कार्यक्षेत्रातील संलग्नित शासकीय / अशासकीय महाविद्यालयात गणित / भौतिकशास्त्र हा विषय घेऊन प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या प्रज्ञावान विद्यार्थ्यांची माहिती सोबतच्या प्रपत्रात अचूक व परिपूर्ण भरुन पाठविण्यात यावी. गणित / भौतिकशास्त्र शिष्यवृत्तीसाठी संबंधित विद्यार्थ्यांना उच्च माध्यमिक परीक्षेतील एकूण गुणांची सरासरी (टक्केवारी) ६० टक्के पेक्षा कमी असता कामा नये. प्रथम वर्ष पदवीसाठी गणित व भौतिकशास्त्र विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांची माहिती विषयनिहाय (गणित/भौतिकशास्त्र) स्वतंत्र देण्यात यावी.

३) या शिष्यवृत्तीचा लाभ विद्यार्थ्यांना लवकरांत लवकर देता यावा यास्तव सर्व अर्जाचे त्वरित संकलन करुन प्रस्ताव **दिनांक ३०/०९/२०१५ पर्यंत या संचालनालयास विद्यापीठमार्फतच पाठविण्यात यावेत. विहित कालमर्यादेत प्राप्त झालेलेच प्रस्ताव स्विकारण्यात येतील. त्यानंतर आलेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाही.**

४) शिष्यवृत्तीसाठीचे प्रस्ताव महाविद्यालयांनी परस्पर या संचालनालयास पाठवू नयेत, अशा स्पष्ट सूचना आपल्या स्तरावर महाविद्यालयांना देण्यात याव्यात. महाविद्यालयाकडून परस्पर प्राप्त झालेले प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत. परस्पर आलेले अर्ज दप्तरी दाखल केले जातील, असेही महाविद्यालयांना कळविण्यात यावे.

**(डॉ. वि. रा. मोरे)**
शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे -१.

प्रत —

१. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई, पुणे, कोल्हापूर, जळगाव, अमरावती, नागपूर, पनवेल, औरंगाबाद, नांदेड, सोलापूर विभाग.
२. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

E:\print\Math & Physics\2015-16\Circular.docx

## राज्य सरकारच्या गणित व भौतिक शास्त्र विषयांच्या शिष्यवृत्तीसाठी अर्ज

हा अर्ज दिनांक ---/---/------ पुर्वी महाविद्यालयास मिळाला पाहिजे. तदनंतर आल्यास विचार केला जाणार नाही.

१) अर्जदार विद्यार्थ्याचे संपुर्ण नांव :

२) अर्जदार कोणत्या जमातीचा आहे ? :

अ) अनुसूचित जाती

ब) अनुसूचित जमाती

क) विमुक्त जाती

ड) भटक्या जमाती

३) प्रवेश कोणत्या शिक्षणक्रमासाठी व कोणत्या वर्गात घेतला ? :

४) वर्गात प्रवेश घेतल्याची तारीख :

५) मार्च / एप्रिल २०१५ मध्ये दिलेल्या परीक्षेसंबंधी माहिती :

| **परीक्षेचे नांव** | **परीक्षा घेणारे विद्यापीठ / विभागातील शालांत परीक्षा** | **परीक्षेत मिळालेले गुण किर्तीपैकी किती** | **प्रतिशत** |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | गणित | |
| | | भौतिकशास्त्र | |

वरील माहिती संपुर्ण बरोबर आहे. मागणी करताच संबंधित कागदपत्रे हजर करीन. मला अन्य कोणतीही शिष्यवृत्ती मिळत नाही अथवा दुसऱ्या शिष्यवृत्तीसाठी अर्ज केला नाही. बी. एस्सी. भाग-१ शिक्षणक्रमासाठी मी गणित / विज्ञान (फिजिक्स) हा प्रमुख विषय घेणार आहे.

दिनांक : **विद्यार्थ्याची सही**

---

### कार्यालयाने भरावयाची माहिती

१) विद्यार्थ्याने दिलेली माहिती पडताळून पाहिली ती बरोबर आहे.

२) विद्यार्थ्याची गणित / विज्ञान (फिजिक्स) विषयातील आवड व प्रगती ही त्या विषयातील असलेल्या शिष्यवृत्तीसाठी निवड करण्यास योग्य आहे.

३) विद्यार्थ्याविषयी विशेष शिफारस. (असल्यास)

### बँक तपशील

| **अ. क्र.** | **विद्यार्थ्याचे नांव** | **बँकेचे नांव** | **बँक खाते क्रमांक** | **आय.एफ.एस्.सी. कोड** | **आधार कार्ड क्रमांक** | **विद्यार्थ्याचा मोबाईल क्रमांक** |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

प्राचार्य

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११००१.
Web : www.dhepune.gov.in E-mail : scholarshiphd@gmail.com
फोन नं. ०२०/२६१२६९३९ फॅक्स नं. ०२०/२६११११५३


क्र.उशिसं/१४अई/खुगुशि/नमं/२०१५-१६/ 7651 दि.१०/०७/२०१५ 29 JUL 2015

**परिपत्रक :-**

**विषय : शासकीस/अशासकीय कला, वाणिज्य, विज्ञान व विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना राज्य शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती. नविन मंजुरी सन २०१५-२०१६**

संदर्भ : १) शासन निर्णय शिक्षण व समाजकल्याण विभाग, मुंबई क्र. एससीएस १०६२. दिनांक : २४/१२/१९५२.

२) शासन निर्णय शिक्षण व समाजकल्याण विभाग मुंबई क्र. एसीएच १०६३,यु. दिनांक : ४ जून, १९६४ व दिनांक : १६/११/१९६४.

३) शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग, मुंबई क्र. एससीएच / १०८२ / ५०६३२०० / (२६५१) सासी-५, दिनांक : २१/१०/१९८५.

४) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मुंबई क्र.एससीएच२००३/(४०५/०३)/मशि-१. दिनांक ५/२/२००४.

शासकीय / अशासकीय कला, वाणिज्य, विज्ञान व विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना राज्य शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती सन २०१५-१६ या वर्षासाठी मंजूर करण्याकरिता विहित नमुन्यात **दि.३०.९.२०१५** पर्यंत प्रस्ताव / अर्ज मागविण्यात येत आहे.

खुली गुणवत्ता शिष्यवृत्तीचे प्रस्ताव खालील बाबींची पडताळणी करुनच संचालनालयास पाठवावी.

१. **आपले महाविद्यालय कोणत्या शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण यांच्या अधिपत्याखाली येते त्याचा स्पष्ट उल्लेख करावा.**

२. **खुल्या गुणवत्ता शिष्यवृत्तीचे प्रस्ताव कला शाखा, वाणिज्य शाखा, विज्ञान शाखा व विधी शाखा असे स्वतंत्रपणे शाखानिहाय तसेच गुणवत्तानिहाय (टक्केवारीनुसार) पाठविण्यात यावेत.**

३. **विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीच्या अर्जासोबत मार्च २०१५ या वर्षी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची गुणपत्रिका साक्षांकित करुनच जोडण्यात यावी. प्रस्ताव हे फक्त सन २०१५-१६ या वर्षीचे पाठवावे. यापूर्वीचे प्रस्ताव पाठवू नये.**

४. **पाठविलेल्या आवेदन पत्रावर प्राचार्यांची अथवा संस्था प्रमुखांची सही व शिक्का आवश्यक आहे. त्याशिवाय आवेदनपत्र स्विकारले जाणार नाही.**

५. **विद्यार्थ्याने आवेदनपत्रात त्याच्या राष्ट्रीयीकृत बँकेचा तपशील बिनचूक भरावा. सोबत बँकेच्या पासबुकच्या पहिल्या पानाची झेरॉक्स प्रत जोडावी.**

आपल्या विद्यापीठातील व विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील संलग्नित शासकीय / अशासकीय महाविद्यालयात मार्च २०१५ मध्ये उच्च माध्यमिक १२ वीची परीक्षा ६० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या कला, वाणिज्य, विज्ञान व विधी महाविद्यालयात प्रथम वर्षाकरिता प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात भरुन **दिनांक** : ३० सप्टेंबर, २०१५ पर्यंत या संचालनालयास पाठविण्यात यावेत.

(कृ.मा.प.)

**विहित कालमर्यादेनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.** तथापि, प्रस्ताव उशिराने प्राप्त झाल्यानंतर होणाऱ्या परिणामाची सर्व जबाबदारी प्राचार्यांवर राहील. कालमर्यादेची मर्यादा कटाक्षाने पाळावी. शिष्यवृत्तीचा लाभ विद्यार्थ्यांना लवकरात लवकर देता यावा, म्हणून महाविद्यालयाने विद्यार्थ्यांकडून अर्ज त्वरित भरुन घेऊन प्रस्ताव खालील दिलेल्या रकान्यात विहित कालमर्यादेत पाठविण्यात यावेत, अशा सूचना आपल्या अधिपत्याखालील सर्व संलग्नित महाविद्यालयाच्या प्राचार्यांना देण्यात याव्यात.

राज्य शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्तीचे अर्ज महाविद्यालयांनी **मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, शिष्यवृत्ती शाखा, मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे-१** या पत्त्यावर पाठवावेत. अशा स्पष्ट सूचना महाविद्यालयांना देण्यात याव्यात.

बँक तपशील

| अ. क्र. | विद्यार्थ्याचे नांव | बँकेचे नांव | बँक खाते क्रमांक | आय.एफ.एस्.सी. कोड | आधार कार्ड क्रमांक | विद्यार्थ्याचा मोबाईल क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |

**(डॉ. वि. रा. मोरे)**
शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे -१.

**प्रत :**

१. सर्व विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

## राज्य सरकारच्या गणित व भौतिक शास्त्र विषयांच्या शिष्यवृत्तीसाठी अर्ज

हा अर्ज दिनांक ---/---/------ पुर्वी महाविद्यालयास मिळाला पाहिजे. तदनंतर आल्यास विचार केला जाणार नाही.

१) अर्जदार विद्यार्थ्याचे संपुर्ण नांव :

२) अर्जदार कोणत्या जमातीचा आहे ? :

अ) अनुसूचित जाती

ब) अनुसूचित जमाती

क) विमुक्त जाती

ड) भटक्या जमाती

३) प्रवेश कोणत्या शिक्षणक्रमासाठी व कोणत्या वर्गात घेतला ? :

४) वर्गात प्रवेश घेतल्याची तारीख :

५) मार्च / एप्रिल २०१५ मध्ये दिलेल्या परीक्षेसंबंधी माहिती :

| परीक्षेचे नांव | परीक्षा घेणारे विद्यापीठ / विभागातील शालांत परीक्षा | परीक्षेत मिळालेले गुण कितींपैकी किती | प्रतिशत |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | गणित | |
| | | भौतिकशास्त्र | |

वरील माहिती संपुर्ण बरोबर आहे. मागणी करताच संबंधित कागदपत्रे हजर करीन. मला अन्य कोणतीही शिष्यवृत्ती मिळत नाही अथवा दुसऱ्या शिष्यवृत्तीसाठी अर्ज केला नाही. बी. एस्सी. भाग-१ शिक्षणक्रमासाठी मी गणित / विज्ञान (फिजिक्स) हा प्रमुख विषय घेणार आहे.

दिनांक :

**विद्यार्थ्याची सही**

---

### कार्यालयाने भरावयाची माहिती

१) विद्यार्थ्याने दिलेली माहिती पडताळून पाहिली ती बरोबर आहे.

२) विद्यार्थ्याची गणित / विज्ञान (फिजिक्स) विषयातील आवड व प्रगती ही त्या विषयातील असलेल्या शिष्यवृत्तीसाठी निवड करण्यास योग्य आहे.

३) विद्यार्थ्याविषयी विशेष शिफारस. (असल्यास)

बँक तपशील

| अ. क्र. | विद्यार्थ्याचे नांव | बँकेचे नांव | बँक खाते क्रमांक | आय.एफ.एस.सी. कोड | आधार कार्ड क्रमांक | विद्यार्थ्याचा मोबाईल क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

प्राचार्य

## ३) राज्य शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्तीः [वरिष्ठ महाविद्यालयीन]

शासन निर्णय शिक्षण व समाजकल्याण विभाग, मुंबई क्र. एससीएच-१०६३ यु, दि. ४ जून, १९६४ व दि. १६ नोव्हें., १९६४ अन्वये राज्य शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना सुरू करण्यात आलेली आहे.

राज्यातील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यास उत्तेजन मिळावे म्हणून सदर शिष्यवृत्ती दिली जाते.

**१) योजनेचे नांव :** खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती.

**२) संच संख्या :** या योजनेकरिता राज्याकरिता एकूण १२०८ संच मंजूर आहेत. त्यांपैकी २३० संच वाणिज्य शाखेसाठी व ५५ संच विधी शाखेसाठी राज्यस्तरावर मंजूर असून उर्वरीत ९२३ संचांपैकी २/३ संच विज्ञान शाखेसाठी व १/३ संच कला शाखेसाठी मंजूर आहेत. सदर संचांची विभागणी शिक्षण मंडळाच्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस बसलेल्या विद्यार्थी संख्येच्या आधारे केली जाते.

**३) शिष्यवृत्तीचा दर :** या शिष्यवृत्तीचा दर रु. १००/- द.म. हा शा. नि. ५।२।२००४ नुसार सुधारित केलेला आहे. नवीन मंजुरी १० महिन्यांकरिता व नूतनीकरण १२ महिन्यांकरिता दिले जाते.

**४) पात्रता :** इ. १२वीच्या परीक्षेत किमान ६०% गुण प्राप्त असणे आवश्यक आहे.

**५) अर्ज कोठे मिळतो :** संबंधित शिष्यवृत्तीचे अर्ज सर्व अकृषि विद्यापीठाकडून त्याच्या अधिपत्याखालील महाविद्यालयांना पाठविले जातात.

**६) अर्ज कोणामार्फत, कोणाच्या नांवे पाठवावयाचा :** संबंधित महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे अर्ज भरून शिक्षण संचालक [उच्च शिक्षण], १७, डॉ. आंबेडकर रोड, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ या कार्यालयाकडे नवीन मंजुरीकरिता पाठविण्यात यावेत. संबंधित पात्र विद्यार्थ्यांना नवीन मंजुरी या संचालनालयाकडून दिली जाते.

**७) अर्ज स्वीकृतिचा अंतिम दिनांक :** या कार्यालयाकडे अर्ज पाठविण्याची अंतिम मुदत ३० सप्टें., नमूद केलेली असते व तसे परिपत्रक सर्व विद्यापीठांना पाठविले जातात.

**८) नवीन मंजुरी/नूतनीकरण :** खुली गुणवत्ता नवीन मंजुरी या संचालनालयाकडून केली जाते व नूतनीकरण संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांचे स्तरावरून मंजूर केले जाते.

* * *

## ७) गणित व भौतिकशास्त्र विषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती

शासन निर्णय क्र. शिक्षण, क्रीडा व समाजकल्याण विभाग क्र. एससी एच-१४७०/१०७५७२/एस. दि. १४. ५. १९७१ अन्वये सुरू करण्यात आलेली आहे. सदर शिष्यवृत्ती गणित/भौतिकशास्त्र या विषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना दिली जाते.

१) **योजनेचे नाव : गणित व भौतिकशास्त्र विषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती.**

२) **संच संख्या :** या योजनेकरिता गणित विषयाकरीता ५० व भौतिक शास्त्र विषयाकरिता ५० संच मंजूर आहेत.

३) **शिष्यवृत्तीचा दर :** पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा रु. १००/- (शा. नि. ५।२।२००४ नुसार) ही शिष्यवृत्ती दिली जाते.

४) **पात्रता :** इ. १२ वी विज्ञान या परीक्षेत किमान ६०% व गणित, भौतिकशास्त्र या विषयांत ६०% पेक्षा अधिक गुण प्राप्त करणाऱ्या व संबंधित विद्यापीठांनी शिफारस केलेल्या विद्यार्थ्यांना सदर शिष्यवृत्ती मंजूर केली जाते.

५) **अर्ज कोठे मिळतो :** अर्ज संबंधित विद्यापीठे आपल्या महाविद्यालयांना पाठवितात.

६) **अर्ज कोणामार्फत कोणाच्या नावे पाठवावयाचा :** पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालयांनी विद्यापीठाकडे पाठविणे आवश्यक असते व विद्यापीठाकडून संबंधित अर्जाची छाननी होऊन विद्यापीठ एकत्र प्रस्ताव मा. शिक्षण संचालक [उच्च शिक्षण]. १७, डॉ. आंबेडकर रोड, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचेकडे पाठवितात.

७) **अर्ज स्वीकृतिचा अंतिम दिनांक :** विद्यापीठांनी प्राप्त करून घेतलेले अर्ज या संचालनालयाकडे पाठविण्यावर अंतिम तारीख ३० सप्टेंबर असते.

८) नवीन मंजुरी/नूतनीकरण : गणित/भौतिकशास्त्र विषयातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची नवीन मंजुरी या संचालनालयाचे स्तरावर केली जाते व नूतनीकरण संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांचे स्तरावरून केले जाते.

९) शा. नि. ५।२।२००४ नुसार खालील प्रमाणे दरामध्ये बदल केलेला आहे.

| पूर्वीचे दर | ५।२।२००४ सुधारित दर |
|---|---|
| रु. ४०/- द.म. | रु. १००/- द.म. |

* * *

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.
web: www.dhepune.gov.in E-mail: dhepune@yahoo.co.in
फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स
०२०/२६११११५३


क्र.उशिसं/एकलव्य/नविन मंजूरी/२०१५-१६/१४ अई 7555 दि. २७/०७/२०१५
28 JUL 2015

परिपत्रक :-

प्रति,

विभागीय शिक्षण सहसंचालक उच्च शिक्षण ,
पुणे/मुंबई/कोल्हापूर/ औरंगाबाद/ नागपूर/ नांदेड/
जळगांव/अमरावती/ पनवेल/ सोलापूर.

विषय : पदव्युत्तर स्तरावर शिक्षण घेणा-या पात्र विद्यार्थ्यांनी एकलव्य आर्थिक सहाय्यासाठी आवेदनपत्रे सादर करणेबाबत.
नवीन मंजूरी/नूतनीकरण सन २०१५-२०१६.

संदर्भ : १. शासन निर्णय क्र.एससीएच/१०१५/८१/मशि-४, दि.७ फेब्रुवारी,१९९६.

संदर्भांकित शासन निर्णयान्वये कला,वाणिज्य,विज्ञान व विधी या विद्याशाखांच्या अतंर्गत पदव्युत्तर शिक्षण घेणा-या आणि विहित अटी पूर्ण करणा-या विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र शासनाने सन १९९५-९६ या वर्षापासून एकलव्य आर्थिक सहाय्य योजना सुरु केलेली आहे.

२/-आपल्या कार्यक्षेत्रातंर्गत सन २०१५-२०१६ या शैक्षणिक वर्षात पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या पात्र विद्यार्थ्यांकडून दि. ३०/०९/२०१५ अखेरपर्यंत विहित नमुन्यात अचुक व परिपुर्ण भरलेली आवेदनपत्रे सहपत्रासह मागविण्यात येत आहेत. सदर प्रस्ताव स्विकारण्याचा अंतिम दि.३०.९.२०१५ असून त्यानंतर प्राप्त झालेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत.

३/- एकलव्य आर्थिक सहाय्यासाठी पात्रतेच्या प्रमूख अटी खालीलप्रमाणे आहेत.

१. पदवी परीक्षेत विज्ञान शाखेत किमान ७० टक्के गुण, तर कला, वाणिज्य, विधी शाखेत किमान ६० टक्के गुण मिळविलेले असावेत. (शासनाकडून प्राप्त आर्थिक तरतूदीनुसार गुणानुक्रमे जास्त गुणानुसार अर्जाचा विचार करण्यात येईल).

२. संबंधित विद्यार्थ्यांचे व त्याच्या आई-वडिलांचे/पालकांचे सर्व मार्गानी मिळून मागील आर्थिक वर्षाचे वार्षिक उत्पन्न रु. ७५,०००/ पेक्षा अधिक नसावे.

३. पदव्युत्तर द्वितीय वर्षासाठी आर्थिक सहाय्याचे नुतनीकरण मंजूर करण्यास पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षी किमान ५० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण होणे आवश्यक आहे,व वार्षिक ७५ टक्के नियमित उपस्थिती आवश्यक आहे. चांगली वर्तणूक असणे आवश्यक आहे. याबाबत प्रचार्य/विद्यापीठीय विभाग प्रमुख यांचे सुस्पष्ट प्रमाणपत्र प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे. पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षी अनुत्तीर्ण असलेल्या व ए.टी.के.टी मिळालेल्या विद्यार्थ्यांना नुतनीकरण मंजूर करता येत नाही. याची कृपया नोंद घ्यावी

तसेच शासनाकडून प्राप्त होणा-या आर्थिक तरतूदीच्या आधीन राहून गुणवत्तेनुसार गुणानुक्रमे संबंधित विद्यापीठनिहाय मंजूरी देण्यात येईल.

४. हया योजनेअंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना रु.५०००/ प्रतिवर्षी आर्थिक सहाय्य देण्यात येईल.

५.एकलव्य आर्थिक सहाय्याबाबत विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेले नविन मंजूरीचे आवेदनपत्रे विद्यापीठे/महाविद्यालये यांनी त्यांचे स्तरावर जबाबदारीने तपासून न पडताळता पाठविली जातात असे संचालनालयाच्या निदर्शनास आलेले आहे म्हणून पात्र विद्यार्थ्यांना एकलव्य आर्थिक सहाय्य मंजूर करणेकामी अडचणी निर्माण होतात व कार्यालयाचा वेळ खर्च होतो. विद्यार्थ्यांस आर्थिक सहाय्य मिळण्यास विलंब होऊ नये किंवा विद्यार्थी आर्थिक सहाय्यापासून वंचित राहू नये म्हणून नविन मंजूरीचा प्रस्ताव सोबत दिलेल्या सूचनाप्रमाणे विद्यापीठ व महाविद्यालये यांनी प्रथम त्यांचे स्तरावर अर्ज तपासूनच अंतिम मंजूरीसाठी या संचालनालयाकडे दिलेल्या विहित मुदतीतच पाठविण्यात यावेत. लाभार्थी विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे अचूक व परिपूर्ण भरावीत म्हणून सदरचे परिपत्रकांची प्रत फलकावर लावावी. तसेच सदरचे प्रस्ताव हे फक्त विद्यापीठे / महाविद्यालयामार्फतच स्विकारुन विचारात घेतले जातील.

६. अपूर्ण असलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

७. विद्यार्थ्यांनी त्यांच्या नजिकच्या राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडणे आवश्यक असून, विद्यार्थ्यांनी त्याचा सद्याचा स्वतःचा सुरु असलेला खाते क्रमांक, बँकेचा संपूर्ण पत्ता, बँक शाखा, कोड नंबर, आयएफएससी कोड, तसेच बँकेचा एमआय सीआर कोड, विद्यार्थ्यांचा दूरध्वनी क्रमांक, इत्यादी माहिती बिनचूकपणे अर्जात नमूद करावी.

८. विद्यार्थ्याने बँक खातेच्या पासबुकाची पहिल्या पानाची झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक आहे.

(डॉ. वि.रा. मोरे)
**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**
**महाराष्ट्र राज्य, पुणे- ०१**

**प्रतः** कुलसचिव, महाराष्ट्र राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठे, यांना माहिती व कार्यवाहीसाठी.